# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.



Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

१३ सप्टेंबर २०२०

: 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)


## १० लाख ९ ६ हजार ३०० रूपयाचा सुगंधीत तंबाखू जप्त

### स्थानिक गुन्हे शाखेची नेरी, पोस्टे चिमुर येथे कार्यवाही

दिनांक १२/०९/२०२० रोजी स्थानीक गुन्हे शाखेच्या पथकास गोपणीय माहीती मिळाली की, पोस्टे चिमुर हद्दीतील ग्राम नेरी येथील इसमाने त्याचे घरात महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेले सुगंधीत तंबाखु व तत्सम पदार्थाची अवैध साठवणुक केली असुन त्याची विक्री करणार आहे. अशा माहीती वरून स्थानीक गुन्हे शाखेच्या पथकाने पोस्टे चिमुर हद्दीतील ग्राम नेरी येथे पोहोचुन गुलाब कामडी यांचे दुकानामागील घराची मिळालेल्या माहीतीच्या आधारे झडती घेतली असता घरामध्ये मजा १०८ हुक्का तंबाखू ५० ग्रॅमचे - १७० डब्बे, २०० ग्रॅमचे-२०४ डब्बे, इगल हुक्का तंबाखु ४० ग्रॅमच्या-२५९५ पाउच व २०० ग्रॅमच्या-१०४८ पाउच असा एकुण १०,९६,३००/- रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस स्टेशन चिमुर येथे अपराध नं. ३३९/२०२० प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असुन पुढील तपास चिमुर पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक चंद्रपुर डॉ.श्री.महेश्वर रेडड्ी यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपुर पोलीस निरिक्षक श्री. ओ.जी. कोकाटे यांचे नेतृत्वात पोउपनि विकास मुंढे, पोउपनि सचिन गदादे, पोशी जावेद, मपोशी अपर्णा व चापोशि ढाकणे यांनी पार पाडली.

---------------------------------------------------------------